RNI No. MAHBIL/2009/37831

सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण भाग चार-ब

वर्ष ५, अंक १५४]  बुधवार, डिसेंबर ११, २०१९/अग्रहायण २०, शके १९४१  [पृष्ठे १५, किंमत : रुपये ९.००

**असाधारण क्रमांक ४३०**

**प्राधिकृत प्रकाशन**

**महाराष्ट्र शासनाने महाराष्ट्र अधिनियमांन्वये तयार केलेले (भाग एक, एक-अ आणि एक-ल यांमध्ये प्रसिद्ध केलेले नियम व आदेश यांव्यतिरिक्त) नियम व आदेश.**

**सार्वजनिक बांधकाम विभाग**

मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२, दिनांक ११ डिसेंबर २०१९

**अधिसूचना**

**महाराष्ट्र मोटार वाहन कर अधिनियम.**

क्रमांक खाक्षेस.२००४/प्र.क्र.२६९/रस्ते-८.—ज्याअर्थी, महाराष्ट्र शासनाने दिनांक २३ फेब्रुवारी २००१ रोजी शासन निर्णय नियोजन विभाग क्रमांक.पासुस.२०००/प्र.क्र.२३/का-१४७४(१), अन्वये नागपूर शहर एकात्मिक रस्ते विकास योजनेमधील सोबतच्या अनुसूची-२ मध्ये नमूद केलेली कामे शासन निर्णयात नमूद केलेल्या कालावधी व अटी व शर्तीस अधीन राहून 'बांधा, वापरा व हस्तांतरित करा' तत्त्वावर पार पाडण्यासाठी महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ मर्यादित यांस उद्योजक म्हणून घोषित केले आहे ;

आणि ज्याअर्थी, महाराष्ट्र शासनाने दिनांक ३० नोव्हेंबर २००२ रोजी निर्गमित केलेल्या शासन अधिसूचना सार्वजनिक बांधकाम विभाग क्रमांक खाक्षेस.२००२/प्र.क्र.१०७/रस्ते-९ अन्वये मुंबई मोटार वाहन कर अधिनियम, १९५८ (१९५८ चा मुंबई ६५) याच्या कलम २० ची पोट-कलमे *(१-अ), (१-ब), (१-क), (१-ड)* आणि *(१-इ)* द्वारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करून खाजगीकरणाच्या माध्यमातून 'बांधा, वापरा व हस्तांतरित करा' या योजनेतून नागपूर शहरातील नव्याने बांधण्यात आलेले रस्ते, पूल, उड्डाणपुलाच्या पोचमार्गासह बांधलेले उड्डाणपूल, रस्त्याचे भाग, पोचमार्गासह बांधलेले वळण मार्ग, भुयारी मार्ग आणि रेल्वे उड्डाणपूल/ रेल्वे खालील पूल यांची करण्यात येणारी बांधणी, पुनर्बांधणी, सुधारणा

किंवा दुरूस्ती किंवा नागपूर शहर एकात्मिक रस्ते विकास कार्यक्रमाचा भाग असलेल्या (सदर अधिसूचनेच्या अनुसूची-२ मध्ये विशेषत्वाने सविस्तर रित्या वर्णन केल्याप्रमाणे) व कलम २० च्या प्रयोजनासाठी साकल्याने एकच मानण्यात आलेल्या कामाच्या समूहाचा वापर करणाऱ्या वाहनांवर आणि वाहनांकडून ओढून नेल्या जाणाऱ्या अनुयानांवर अनुसूची-१ च्या स्तंभ (३) मध्ये त्यांच्यासमोर विनिर्दिष्ट केलेल्या दराने व कालावधीसाठी——

(१) नागपूर-काटोल रस्ता, राज्य मार्ग २४८ वरील जकात नाक्याजवळ,

(२) नागपूर-उमरेड रस्ता प्रमुख राज्य मार्ग क्रमांक ९ वरील जकात नाक्याजवळ,

(३) नागपूर-हिंगणा रस्ता राज्य मार्ग २५५ वरील अभियांत्रिकी महाविद्यालयाजवळ,

(४) हिंगणा रस्ता ते अमरावती रस्ता यामधील रिंग रोडवरील वाडी जंक्शन येथे बांधण्यात आलेल्या पथकर स्थानकांवर दिनांक १ डिसेंबर २००२ ते दिनांक ३० नोव्हेंबर २००५ पर्यंत पथकर गोळा करण्यात येत होता ;

आणि ज्याअर्थी, महाराष्ट्र शासनाकडून वर निर्देशित अधिनियमांतर्गत दिनांक ५ जून २००७ रोजी निर्गमित केलेल्या शासन अधिसूचना सार्वजनिक बांधकाम विभाग क्रमांक खाक्षेस-२००४/प्र.क्र.२६९/रस्ते-८ द्वारे अनुसूची-१ च्या स्तंभ (२) मध्ये सविस्तर रित्या वर्णन केल्याप्रमाणे वाहनांवर आणि वाहनांकडून ओढून नेल्या जाणाऱ्या अनुयानांवर अनुसूची-१ च्या स्तंभ (३) मध्ये त्यांचेसमोर विनिर्दिष्ट केलेल्या दराने निर्देशित विविध रस्त्यांच्या (१) नागपूर - काटोल रस्ता, राज्य मार्ग २४८ वरील जकात नाक्याजवळ, (२) नागपूर - उमरेड रस्ता प्रमुख राज्य मार्ग क्रमांक ९ वरील जकात नाक्याजवळ, (३) नागपूर-हिंगणा रस्ता राज्य मार्ग २५५ वरील अभियांत्रिकी महाविद्यालयाजवळ, (४) हिंगणा रस्ता ते अमरावती रस्ता यामधील रिंग रोडवरील वाडी जंक्शन, (५) वाडी ते काटोल रस्त्यावरील किलोमीटर १/२०० येथील जकात नाका येथील पथकर स्थानकांवर दिनांक १ डिसेंबर २००५ ते दिनांक ३१ डिसेंबर २०१४ पर्यंत पथकर लावण्यात आला होता ;

आणि ज्याअर्थी, महाराष्ट्र शासनाकडून वर निर्देशित अधिनियमांतर्गत दिनांक २३ जानेवारी २०१५, दि. ०२ जानेवारी २०१६, दि.३१ डिसेंबर २०१६, दि.२० डिसेंबर २०१७ व दि.२१ डिसेंबर २०१८ रोजी निर्गमित केलेल्या शासन अधिसूचना सार्वजनिक बांधकाम विभागाद्वारे अनुसूची-१ च्या स्तंभ (२) मध्ये सविस्तर रित्या वर्णन केल्याप्रमाणे वाहनांवर आणि वाहनांकडून ओढून नेल्या जाणाऱ्या अनुयानांवर अनुसूची-१ च्या स्तंभ (३) मध्ये त्यांचेसमोर विनिर्दिष्ट केलेल्या दराने निर्देशित वरीलप्रमाणे विविध रस्त्यांवर दिनांक ३१ डिसेंबर २०१९ पर्यंत पथकर लावण्यात आला आहे ;

आणि ज्याअर्थी, महाराष्ट्र शासनाने विविध रस्त्यांवर अनुसूची-१ च्या स्तंभ (२) मध्ये सविस्तर रित्या वर्णन केल्याप्रमाणे वाहनांवर आणि वाहनांकडून ओढून नेल्या जाणाऱ्या अनुयानांवर अनुसूची-१ च्या स्तंभ (३) मध्ये त्यांचेसमोर विनिर्दिष्ट केलेल्या दराने पथकर लागू करून तो वरील पथकर स्थानकांवर गोळा करणे शासनास उपयुक्त राहील याकरिता मुदत वाढवून ती दि.३१ डिसेंबर २०२० पर्यंत करणे आवश्यक आहे.

त्याअर्थी, आता, मुंबई मोटार वाहन कर अधिनियम, १९५८ (१९५८ चा मुंबई ६५), याच्या कलम २० ची पोट-कलमे *(१-अ), (१-ब), (१-क), (१-ड)* आणि *(१-इ)* द्वारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करून महाराष्ट्र शासन याद्वारे घोषित करते की, सोबतच्या अनुसूची-१ च्या स्तंभ (२) मध्ये सविस्तर रित्या वर्णन केल्याप्रमाणे वाहनांवर आणि वाहनांकडून ओढून नेल्या जाणाऱ्या अनुयानांवर अनुसूची-१ च्या स्तंभ (३) मध्ये त्यांचेसमोर विनिर्दिष्ट केलेल्या दराने व कालावधीसाठी बांधण्यात आलेल्या पथकर स्थानकांवर दि.०१ जानेवारी २०२० ते दि.३१ डिसेंबर २०२० या कालावधीसाठी पथकर बसविण्यात येत आहे.

## अनुसूची-१

| अ. क्र. (१) | वाहनांचा प्रकार (२) | पथकराचे प्रतिफेरीचे दर (रुपये) (३) |
|---|---|---|
| | | ०१/०१/२०२० ते ३१/१२/२०२० |
| १. | स्कूटर, मोटारसायकल, चालकाव्यतिरिक्त तीन प्रवासी वाहन क्षमता असलेल्या ऑटोरिक्षा, रिकाम्या ट्रॉलीसह ट्रॅक्टर. | निरंक |
| २. | मोटार वाहन अधिनियम, १९८८ (१९८८ चा ५९) मध्ये नमूद केल्याप्रमाणे हलकी मोटार वाहने— | |
| | (अ) कार, जीप, टाटा सुमो, ट्रॅक्स, वाहनचालक वगळून सहा आसनी प्रवासी रिक्षा, कमांडर व इतर तत्सम वाहने (चालक वगळून १२ प्रवासी क्षमता असलेली), | निरंक |
| | (ब) मिनी बस किंवा तत्सम वाहने (चालकाव्यतिरिक्त १२ पेक्षा अधिक आणि २० पर्यंत प्रवासी वाहन क्षमतेची) आणि अनुक्रमांक ३ व ४ येथे नमूद नसलेली माल वाहतुकीची वाहने. | ४५.०० |
| ३. | ट्रक, बस | ७५.०० |
| ४. | मोटार वाहन अधिनियम, १९८८ (१९८८ चा ५९) मध्ये व्याख्या केल्याप्रमाणे व अनुक्रमांक ३ मध्ये नमूद केलेली वाहने वगळून अवजड वाहने उदा. ट्रक-ट्रेलर, दोनपेक्षा अधिक आसांची वाहने. | ९०.०० |

**टिप्पणी:-**

(१) पथकराच्या दरात खालीलप्रमाणे सवलती देण्यात येतील :—

(अ) एखाद्या वाहनधारकाने ५० किंवा १०० कूपन्स असलेली पथकर पुस्तिका आगाऊ खरेदी केल्यास त्यास पुस्तिकेच्या किमतीमध्ये अनुक्रमे २५ टक्के व ५० टक्के, सवलत देण्यात येईल.

(ब) वारंवार प्रवास करणाऱ्या वाहनांसाठी परतीच्या प्रवासाचे व दैनिक पासाचे दर हे त्या वाहनाच्या एकेरी प्रवास दराच्या अनुक्रमे दीड पट व अडीच पट राहतील. परतीच्या प्रवासाचा पास व दैनिक पास हा ज्या दिवशी पास काढला जाईल त्या दिवशीच्या रात्री १२-०० वाजेपर्यंत ग्राह्य राहील.

(क) मासिक पासाचे दर एकेरी प्रवास दराच्या ५० पट राहतील.

(२) उपरोल्लिखित कोणत्याही दोन पथकर नाक्यांवरून सहा तासांच्या आत वाहन जात असेल तर त्या वाहनांस फक्त एकदाच पहिल्या पथकर नाक्यावर पथकर द्यावा लागेल.

(३) खालील वाहनांना पथकरातून सूट देण्यात येईल :—

(१) केंद्र व राज्य शासकीय वाहने.

(२) लष्करी वाहने.

(३) पोलिस दलाची वाहने.

(४) अग्निशमन दलाची वाहने.

(५) रुग्णवाहिका.

(६) शववाहिका.

(७) टपाल व तार खात्याची वाहने.

(८) लोकसभा व राज्यसभेचे विद्यमान सदस्य तसेच महाराष्ट्र विधानसभा व महाराष्ट्र विधानपरिषदेचे विद्यमान सदस्य प्रवास करीत असलेली वाहने.

(९) महाराष्ट्रातील माजी संसद सदस्य व माजी महाराष्ट्र विधानसभा सदस्य किंवा माजी महाराष्ट्र विधान परिषद सदस्य प्रवास करीत असलेली वाहने.

(१०) महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळाच्या बसेस (एस.टी.)

(११) स्कूल बसेस

(४) या प्रयोजनांकरिता उपरोल्लिखित पथकर नाक्यांवर पथकराची संपूर्ण रक्कम वसूल करण्याचा आणि ठेवून घेण्याचा हक्क महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ मर्यादित, मुंबई यांना प्रदान करण्यात आला आहे.

## अनुसूची २

खालील रस्ते, उड्डाणपूल व त्यांचे पोच मार्ग, रस्त्यांचे भाग, वळणरस्ते व त्यांचे जोड रस्ते, रेल्वे उड्डाणपूल तथा भुयारी पूल महाराष्ट्र मोटार वाहन कर अधिनियमाच्या कलम २० च्या प्रयोजनासाठी साकल्याने एकच मानण्यात येतील.

### नागपूर एकात्मिक रस्ते विकास कार्यक्रम यंत्रणा - नागपूर महानगरपालिका

| अ.क्र. (१) | रस्त्यांचे नाव (२) |
|---|---|
| १ | गोळीबार चौक ते नंदगीरी रोड ते आवले चौक ते कामठी रींग रोड ते नारा गावापर्यंत (सिमेंट काँक्रिट रोड) |
| २ | पाचपावली स्टेशन जवळच्या डॉ. आंबेडकर मार्गापासून ते शिवकृपा मंगल कार्यालय ते नागपूर सुधार प्रन्यास विभागीय कार्यालय ते कामठी रींग रोड ते ग्रामीण पोलीस मुख्यालय आणि सुगत नगर चौक रींग रोड पर्यंत. |
| ३ | कामठी रस्त्यावर पूल क्र.१० पासून ते आवले चौक ते इतवारी स्टेशन रस्ता टी पॉईंट व्हाया नागपूर सुधार प्रन्यास विभागीय कार्यालय (सिमेंट काँक्रीट रोड) |
| ४ | डॉ. आंबेडकर मार्गापासून ते रानी दुर्गावती चौक ते नागपूर महानगरपालिका कॅटल पॉंड ते रींग रोड |
| ५ | कामठी रोड पासून ते अशोक चौक ते सिमेंट रोड (ऑरेंज मार्केट रोड) |
| ६ | इतवारी रेल्वे ओलांडणी पूल ते नारा रस्ता टी पॉईंट |
| ७ | रींग रोड पासून सीएमपीडीआय ते भीम चौक ते पाटनकर चौक |
| ८ | क्राडक रोड पासून रेल्वे खालील पूल ते मारवाडी चौक |
| ९ | आर.ओ.बी. पासूनच्या सेंट्रल ॲव्हेन्यु रोड ते वैष्णोदेवी चौकापर्यंत |
| १० | सेंट्रल ॲव्हेन्यु दोसर भवन चौक ते क्राडक रोड ते कब्रस्थान |
| ११ | रेल्वे फीडर रोड नाका क्र.१३ ते बडकस चौक ते इतवारी शहीद चौक |
| १२ | आर.ओ.बी. पासून रेल्वे फीडर ते कॉटन मार्केट चौक ते पटेल चौक ते आय सोलेशन हॉस्पीटल ते मेडीकल चौक ते क्रीडा चौक-आवारी चौक-रेशीमबाग चौक-सी.पी.ॲण्ड बेरार कॉलेज. |
| १३ | एम्प्रेस मील ते आग्याराम देवी चौक-एस.टी.स्टॅन्ड-बैद्यनाथ चौक-मेडीकल चौक- तुकडोजी चौक (व्हाया हिन्दू ज्ञानपीठ) |
| १४ | क्रीडा चौक ते तुकडोजी पुतळा |
| १५ | पंचशील चौक ते ग्रेट नाग रोड ते जगनाडे चौक |
| १६ | जुना भंडारा चौकावर सुनील हॉटेल ते डॉ. राजेंद्रप्रसाद चौक ते जगनाडे चौक ते उमरेड रोड वर भांडे प्लॉट चौक ते छोटा ताजबाग ते तुकडोजी पुतळा ते वंजारी नगर इ.एस.आर. |
| १७ | टिळक पुतळा ते नतीक चौक ते सुभाष रोड ते हुतात्मा चौक ते लोहा पूल ते आनंद टॉकीज ते रानी झाँसी चौक |
| १८ | व्हेरायटी चौक ते मुंजे चौक ते मेहाडीया चौक ते काँग्रेस नगर (आनंद मंगल कार्यालय) |
| १९ | गोरक्षण रोड /हिम्प यार्ड रोड ते वर्धा रोड |
| २० | ईतवारी रेल्वे स्टेशन ते रींग रोड (जुना कामठी रस्ता) |
| २१ | उमरेड रोड, सूत गिरणी ते श्रीकृष्ण नगर चौक (मीडल रींग रोड) |

| अ.क्र. (१) | रस्त्यांचे नाव (२) |
|---|---|
| २२ | बडकस चौक ते लाकडी पूल आणि आझाद चौक ते लाकडी पूल-सक्करदरा चौक व्हाया जुनी शुक्रवारी |
| २३ | ग्रेट नाग रोड एस.डी. हॉस्पीटल तिरंगा चौक ते नंदनवन मेन रोड |
| २४ | छोटा ताजबाग-संजुबा हायस्कुल बसवेश्वर पुतळा-आशिर्वाद नगर ते रींग रोड (हुडकेश्वर रोड) |
| २५ | रीज रोड ते रींग रोड (रामेश्वरी रोड) |
| २६ | लींक रोड (रेसीडेंन्सी रोड ते कामठी रोड-राष्ट्रीय महामार्ग क्र.७) |
| २७ | न्यु वस्ती म.न.पा. स्कुल - गोंडवाना चौक- छिंदवाडा रोड - राज नगर |
| २८ | छिंदवाडा रोडमध्ये लींक रोड ते काटोल रोड पर्यंत |
| २९ | बोरगांव चौक - वेस्ट मानकापूर रेल्वे क्रॉसिंग व्हाया अवस्ती नगर चौक |
| ३० | अवस्ती नगर चौक ते पोलीस लाईन टाकळी फीडर रोड (डी.पी.रोड) |
| ३१ | वेस्ट हायकोर्ट रोड- जुना काटोल नाका चौक ते जापानी गार्डन- लॉ कॉलेज चौक- शंकर नगर चौक-लक्ष्मीनगर चौक रींग रोड पर्यंत. |
| ३२ | ईस्ट हायकोर्ट रोड- तिरपुडे कॉलेज ते जी.पी.ओ.चौक ते भोळे पेट्रोल पंप-दिक्षा भूमी चौक ते आर.पी.टी.एस.रोड |
| ३३ | पार्क रोड- रामनगर चौक ते एल.ए.डी. कॉलेज चौक ते श्रद्धानींदपेठ चौक |
| ३४ | माउंड रस्त्यावर साळवे पुतळा ते आकाशवाणी चौक ते महाराजबाग चौकापर्यंत |
| ३५ | सी.के.नायडू चौक ते बीशप कॉटन स्कुल ते विधान भवन चौकापर्यंत व्हाया नागपूर महानगरपालिका |
| ३६ | माधवनगर चौकापासून आर.पी.टी.एस.रोड ते अजनी चौक व्हाया आर.पी.टी.एस.चौक |
| ३७ | अजनी ओव्हर पूलापासून चुनाभट्टी रोड ते अजनी चौक-खामला रोड ते रींग रोड पर्यंत. |
| ३८ | उमरेड रोड (माता मंदीर) ते आशिर्वाद नगर रोड. |
| ३९ | शास्त्रीनगर चौक ते के.डी.के कॉलेज ते श्रीकृष्णनगर उमरेड रोड |
| ४० | वर्धमाननगर चौक ते भंडारा रोड विकास इंडस्ट्री चौक ते डेप्युटी सिग्नल शितला माता चौक (न जोडलेली लांबी) |
| ४१ | अयोध्या नगर ते बसवेश्वर पुतळा |
| ४२ | आंबेडकर चौक ते नागपूर नागरिक बँक ते भंडारा रोड |
| ४३ | पाम रोड रेल्वे स्टेशन ते रिझर्व्ह बँक चौक ते रामगिरी, सेमीनरी हिल्स |
| ४४ | दक्षिण अंबाझरी रोड- वर्धा रोड रहाटे कॉलनी ते अंबाझरी टी पॉईंट |
| ४५ | ईस्ट हायकोर्ट रोड- आयकर ऑफिस ते अमरावती रोड |
| ४६ | वेस्ट हायकोर्ट रोड- सेमीनरी हिल्स ते एम.एल.ए. हॉस्टेल |

**कार्यान्वित यंत्रणा - सा. बां. विभाग**

| अ.क्र. (१) | रस्त्यांचे नाव (२) |
|---|---|
| १ | रींग रोड |
| | १) भंडारा रोड ते कामठी रोडचे रुंदीकरण, मजबुतीकरण व डांबरीकरण करणे. |
| | २) वर्धा रोड ते भंडारा रोडचे रुंदीकरण, मजबुतीकरण व डांबरीकरण करणे. |
| | ३) छिंदवाडा रोड ते काटोल रोडचे रुंदीकरण, मजबुतीकरण व डांबरीकरण करणे |
| | ४) कामठी रोड ते छिंदवाडा रोडचे रुंदीकरण, मजबुतीकरण व डांबरीकरण करणे. |
| | ५) अमरावती रोड ते हिंगणा रोडचे (एमआयडीसी रस्ता) रुंदीकरण, मजबुतीकरण व डांबरीकरण करणे. |
| | ६) नागपूर - हिंगणा रोडचे रुंदीकरण, मजबुतीकरण व डांबरीकरण करणे. (रिंग रोडचा भाग) |
| | ७) रिंगरोड वर सेंट्रल डिवायडर चे बांधकाम करणे. |
| | ८) हिंगणा रोड ते उमरेड रोड या मधील सर्व्हिस रोड चे बांधकाम करणे. |
| २ | आनंद टॉकीज चौकापासून हिम्प यार्ड रोड ते अजनी रेल्वे स्टेशन |

**कार्यान्वित यंत्रणा - नागपूर सुधार प्रन्यास**

| अ.क्र. (१) | रस्त्यांचे नाव (२) |
|---|---|
| १ | कामठी रोड रा.म.७ पासून ईतवारी रेल्वे स्टेशन रोड ते मारवाडी चौक. |
| २ | गायत्री मंदीर रोड (डी.पी.रोड) ते दक्षिण आंबाझरी रोड ते रींग रोड |
| ३ | खरबी रोड ते रींग रोड. |
| ४ | ओमकार नगर ते साईबाबा कॉलेज |
| ५ | मंगळवारी रेल्वे क्रॉसिंग गेट हरीजन कॉलनी ते जुना जरीपटका (मेकोसाबाग) ते सीएमपीडीआय ते नारा घाट रोड |
| ६ | डेप्युटी सिग्नल रेल्वे क्रॉसिंग ते कळमना मार्केट रस्ता |
| ७ | उमरेड रोड ते नरसाळा रस्ता. |
| ८ | विद्युत भवन पासून टाकळी फीडर रोड ते कडबी चौक ते संत्रा मार्केट ऑक्ट्रॉय नाका क्र.१३ |
| ९ | राजभवन चौक ते कोराडी रोड ऑक्ट्रॉय नाका |
| १० | आर.बी.आय. चौकापासून ते काटोल रोड ऑक्ट्रॉय नाका |

| अ.क्र. (१) | रस्त्यांचे नाव (२) |
|---|---|
| ११ | उत्तर आंबाझरी रोड-झाँसी राणी चौक ते अंबाझरी टी पॉईंट ते हिंगणा रोड ऑक्ट्रॉय नाका |
| १२ | रिंग रोड |
| | *अ)* रिंग रोड - अमरावती रोड ते काटोल रोड, वाडी जवळ बांधकाम |
| | *ब)* रिंग रोड - काटोल रोड ते छिंदवाडा रोड, काटोल बाजूकडील बांधकाम |
| | *क)* छिंदवाडा बाजूकडील बांधकाम |

**कार्यान्वित यंत्रणा - महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ (मर्यादित)**

| अ.क्र. (१) | रस्त्यांचे नाव (२) |
|---|---|
| १ | संत्रा मार्केट जवळील रेल्वे उड्डाणपूल |
| २ | ईतवारी रेल्वे स्टेशनजवळील रेल्वे उड्डाणपूल |
| ३ | कमलाप्रसाद दुबे नगर जवळील रेल्वे उड्डाणपूल |
| ४ | कळमना मार्केट रींग रोड जवळील रेल्वे उड्डाणपूल |
| ५ | नागपूर दिल्ली लाईनवर मेकोसाबाग रेल्वे उड्डाणपूल |
| ६ | मानकापूर जवळील रींग रोडवर रेल्वे उड्डाणपूल |
| ७ | मंगळवारी रेल्वे क्रॉसिंग रेल्वे उड्डाणपूल |
| ८ | मस्कासाथ रेल्वे उड्डाणपूल |
| ९ | रेल्वे फिडर रोडला मोमीनपूरा रेल्वे उड्डाणपूल |
| १० | गंगाबाई घाट जवळील हत्ती नाल्यावर चार पदरी पूल |
| ११ | जुनी शुक्रवारी जवळ नाग नदीवर चार पदरी पूल |
| १२ | निडोस हॉटेल, सिताबर्डी जवळ नाग नदीवर चार पदरी पूल |
| १३ | उमरेड रोड जंक्शन रींग रोडवर उड्डाणपूल |
| १४ | सक्करदरा चौकातील उमरेड रोडवर उड्डाणपूल |

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**अ. अ. सगणे,**
शासनाचे सचिव.

**PUBLIC WORKS DEPARTMENT**

Madam Cama Marg, Hutatma Rajguru Chowk,
Mantralaya, Mumbai 400 032, dated the 11th December 2019

*NOTIFICATION*

MAHARASHTRA MOTOR VEHICLES TAX ACT.

No. PPP 2004/C.R.269/Road–8.—Whereas the Government of Maharashtra has, *vide* the Government Resolution, Planning Department, Nos. Pasus-2000/C.R.23/Ka.1474(1), dated the 23rd February 2001, declared the Maharashtra State Road Development Corporation Limited as an entrepreneur to carry out the work of the Nagpur City Integrated Road Development Programme to complete the works mentioned in the Annexure 'A' appened thereto under the Build, Operate and Transfer (BOT) Scheme within the period and subject to the terms and conditions mentioned thereunder ;

And whereas, the Government of Maharashtra has, *vide* the Government Notification, Public Works Department, No. PSP-2002/CR-107/Road-9, dated the 30th November 2002, issued in exercise of the powers conferred by sub-sections (*1-A*), (*1-B*), (*1-C*), (*1-D*) and (*1-E*) of section 20 of the Maharashtra Motor Vehicles Tax Act (LXV of 1958), levied and collected the toll on the classes of motor vehicles specified in column (2) of the Schedule I appended thereto and on the trailors drawn by such motor vehicles passing over any of the bridges, flyover bridges, railway over or under bridges including the approach roads thereto, subways, sections of roads or by passes situated within or on the periphery of the City of Nagpur which were being newly constructed, re-constructed, improved or repaired, or which form a part of Nagpur City Integrated Road Development Programme (more particularly described in Schedule II appened to the said notification), the cluster of which was declared as one single entity for the purposes of the said section 20, under the Build, Operate and Transfer (BOT) Scheme, at the rates and for the periods respectively, specified against each of the said vehicles in column (3) of the said Schedule I, at the toll collection centers constructed on (1) Nagpur–Katol Road, State Highway Number 248, Near Octroi Naka, (2) On Nagpur–Umred Road, Major State Highway Number 9, Near Octroi Naka, (3) On Nagpur–Hingna Road, State Highway Number 255, Near Engineering College and (4) On Ring Road, between Hingana Road to Amravati Road Near Wadi Junction, with effect from the 1st December 2002 to 30th November 2005 ;

And whereas, the Government of Maharashtra has, *vide* Government Notification, Public Works Department, No.PSP-2004/CR-269/Road-8, dated the 5th June 2007, issued under the said Act, levied the toll on the said classes of motor vehicles passing over the above mentioned cluster of roads, etc at the toll collection centers constructed on (1) Nagpur–Katol Road, State Highway Number 248, Near Octroi Naka, (2) On Nagpur–Urmed Road, Major State Highway Number 9, Near Octroi Naka, (3) On Nagpur–Hingna Road State Highway Number 255, Near Engineering College, (4) On Ring Road, between Hingana Road to Amravati Road Near Wadi Junction and (5) On Wadi-Katol Road at Kilometre 1/200 near Octroi Naka, with effect from the 1st December 2005 to 31st December 2014 ;

And whereas, the Government of Maharashtra has, *vide* the Government Notifications, Public Works Department, dated 23rd January 2015, 2nd January 2016, 31st December 2016, 20th December 2017 and 21st December 2018 issued under the said Act, levied the toll on the said classes of motor vehicles passing over the above mentioned cluster of roads, etc. at the above referred toll collection centers upto the 31st December 2019;

And whereas, the Government of Maharashtra considers it expedient to levy and collect the toll on the said classes of motor vehicles passing over the above mentioned cluster of roads, etc. up to the 31st December 2020;

Now, therefore, in exercise of the powers conferred by sub-sections (*1-A*), (*1-B*), (*1-C*), (*1-D*) and (*1-E*) of section 20 of the Maharashtra Motor Vehicles Tax Act (LXV of 1958), the Government of Maharashtra hereby declares that, the toll shall be levied, on the classes of motor vehicles specified in column (2) of the Schedule I appended hereto and on the trailors drawn by such motor vehicles passing over cluster of roads, etc., more particularly described in Schedule II appended hereto which has been declared as one single entity for the purposes of section 20 of the said Act, at the rates specified against each of the said vehicles in column (3) of the said Schedule I, and collected at the said toll collection centers with effect from the 1st January 2020 to the 31st December 2020.

**Schedule I**

| Sr. No (1) | Particular of Motor Vehicles (2) | Rate of toll per trip in rupees (3) |
|---|---|---|
| | | 01.01.2020 to 31.12. 2020 |
| 1. | Scooter, Motor Cycle, Moped or any other two wheeler, Tractor with unladen trolley and Auto Rickshaw registered to carry three passengers excluding driver. | NIL |
| 2. | Light Motor Vehicles as defined in the Motor Vehicles Act, 1988 (59 of 1988).— | |
| | *(a)* Car, Jeep, Tata Sumo, Trax, Six Seater Rickshaw, Commander or any other similar vehicles having carriage capacity upto twelve passengers (excluding driver). | NIL |
| | *(b)* Mini bus or any other similar vehicles (having carriage capacity of more than twelve and upto twenty passengers, excluding driver) and goods carriage vehicles except vehicles included in entries at serial numbers 3 and 4 below: | 45.00 |
| 3. | Truck, Bus. | 75.00 |
| 4. | Heavy goods vehicles and heavy passenger motor vehicles as defined in the Motor Vehicles Act, 1988 (59 of 1988), such as Truck-Trailers combination, Multi-axle Vehicles, etc., except vehicles covered by the entry at serial number 3 above. | 90.00 |

**Notes .—**

(1) Concession in rates of toll are as given below, namely :—

*(a)* If a vehicle user purchases a toll coupon book in advance containing 50 or 100 coupons, he shall be given a discount of 25 per cent., and 50 per cent, respectively.

*(b)* The rates of return journey pass and daily pass of the frequently plying vehicles shall be one and a half times and two and a half times of their respective one way travel rates. Return journey pass and daily pass will be valid upto 12-00 midnight for the day of issuing the pass.

*(c)* The rates of monthly passes will be 50 times of their respective one way travel rates.

(2) Vehicles passing through any two of the above toll collection centres within six hours, shall be required to pay toll charges only once at the first toll collection centre.

(3) The following types of motor vehicles are exempted from payment of toll, namely :—

*(i)* Central and State Government Vehicles.

*(ii)* Defence Vehicles.

*(iii)* Police Vehicles.

*(iv)* Fire Fighting Vehicles.

*(v)* Ambulances.

*(vi)* Hearses.

*(vii)* Vehicles of Post and Telegraph Department.

*(viii)* Vehicle carrying sitting members of Parliament, Maharashtra Legislative Assembly and Maharashtra Legislative Council.

*(ix)* Vehicle in which ex-members of Parliament, Maharashtra Legislative Assembly and Maharashtra Legislative Council are travelling.

*(x)* Buses of the Maharashtra State Road Transport Corporation (ST).

*(xi)* School Buses.

(4) For the purposes of this notification, the Maharashtra State Road Development Corporation Limited, Mumbai, is authorized to collect the toll at the above mentioned toll collection centres for the above mentioned period and retain the amount of the toll.

## SCHEDULE II

The following Roads, Flyovers, including approach roads thereto, sections of roads bypasses, service roads to bypasses and railway over/ under bridges, have been declared as a single entity for the purpose of section 20 of the Maharashtra Motor Vehicle Tax Act.

**Nagpur City Integrated Road Development Programme**
**Revised list of works as per actual executing agencies**

**Executing Agency : Nagpur Municipal Corporation**

| Sr. No. (1) | Name of Road (2) |
|---|---|
| 1 | Golibar Square to Nandgiri Road to Awale Square to Kamptee Road to Ring Road upto Nara Village (Cement Concrete Road). |
| 2 | From Dr. Ambedkar Marg near Panchpaoli station upto Shivkripa Mangal Karyalaya to NIT Div. Office to Kamptee Road upto Ring Road via Rural Police H.Q. and upto Sugat Nagar Square Ring Road. |
| 3 | From 10 No. bridge on Kamptee Road to Awale square to Itwari station road T point via. NIT Div. Office (Cement Concrete Road). |
| 4 | From Dr. Ambedkar Marg to Rani Durgawati square to NMC Cattle Pond to Ring Road. |
| 5 | From Kamptee Road to Ashok square to Cement Road (Orange market Road). |
| 6 | From Itarsi Rly. over bridge to Nara Road T Point. |
| 7 | From Ring Road-CMPDI to Bhim chowk to Patankar square. |
| 8 | Cradak Road from Rly. under bridge to Marwardi square |
| 9 | Central Avenue from R.O.B. to Vaishnodevi square. |
| 10 | From Central Avenue Dosar Bhawan Square to Cradak Road to Kabrastan. |
| 11 | Rly. Feeder Road Naka No.13 to Badkas square to Itwari Shahid square. |
| 12 | Rly. Feeder Road from R.O.B. to Cotton Market square to Patel square to Isolation Hospital to Medical square to Krida square-Awari square-Reshimbagh square-C.P. & Berar College. |
| 13 | From Empress Mill to Agyaram Devi square-S.T.Stand-Baidhyanath square-Medical square-Tukdoji square (via. Hindu Gyanpith). |
| 14 | Krida square to Tukdoji statue. |
| 15 | Panchsheel square to Great Nag Road to Jagnade square. |
| 16 | Road from Sunil Hotel on Old Bhandara square to Dr. Rajendra Prasad Square to Jagnade square to Bhande Plot square on Umrer road to Chhota Tajbagh to Tukdoji statue to Wanjari Nagar ESR. |
| 17 | Tilak statue to Natik chowk to Subhash road to Hutatma chowk to Loha Pool to Anand Talkies to Rani Jhanshi square. |
| 18 | Variety square to Munje Chowk to Mehadia square to Congress Nagar (Anand Mangal Karyalaya). |
| 19 | Gorkashan Road / Hymp Yard Road to Wardha Road. |
| 20 | Itwari Rly. Station to Ring Road (Old Kamtpee Road) |

| Sr. No. (1) | Name of Road (2) |
|---|---|
| 21 | Umrer Road Soot Girani to Shrikrishna Nagar Square (Middle Ring Road). |
| 22 | Badkas chowk to Lakdi Pool and Azad square to Lakdi Pool-Sakkardara square via. Juni Shukrawari. |
| 23 | Great Nag Road S. D. Hospital Tiranga chowk to Nandanwan Main Road. |
| 24 | Chhota Tajbagh-Sanjuba High School Basweshwar Statue-Ashirwad Nagar to Ring Road (Hudkeshwar Road). |
| 25 | Ridge road to Ring Road (Rameshwari Road). |
| 26 | Link Road (Residency Road to Kamptee Road-NH-7). |
| 27 | New Basti NMC School-Gondwana Square-Chindwara Road-Raj Nagar. |
| 28 | Link Road between Chindwara road upto Katol Road. |
| 29 | Borgaon Square-West Mankapur Rly. Crossing via. Awasti Nagar square. |
| 30 | Awasti Nagar Square to Police Line Takli Feeder Road (D. P. Road). |
| 31 | West High Court Road-Old Katol Naka Square to Japanee Garden-Law College Square-Shankar Nagar Square-Laxmi Nagar square upto Ring Road. |
| 32 | East High Court Road-Tirpude College to G.P.O. Square to-Bhole Petrol Pump-Dikshabhoomi Square to R. P. T. S. Road. |
| 33 | Park Road Ram Nagar Square to L.A.D. College Square to Shradhanandpeth Square. |
| 34 | Salve Statue on Mound Road to Akashwani Square upto Maharajbagh square. |
| 35 | C.K.Naidu Square to Bishop Cotton School upto Vidhan Bhawan Square via. NMC. |
| 36 | R.P.T.S.Road from Madhav Nagar Square to Ajni Square via. R. P. T. S. Square. |
| 37 | Chuna Bhatti road from Ajni over bridge to Ajni Square-Khamla road upto Ring Road. |
| 38 | Umred Road (Mata Mandir) to Ashirwad Nagar Road. |
| 39 | Shastri Nagar Square to K.D.K. College to Shrikrishna Nagar Umrer Road. |
| 40 | Wardhaman Nagar Square to Bhandara Road Vikas Industry Square to Deputy Signal Sitala Mata Square (Unconnected Length). |
| 41 | Ayodhya Nagar to Basweshwar Statue. |
| 42 | Ambedkar Square to Nagpur Nagrik Bank to Bhandara Road. |
| 43 | Palm Road Railway Station to Reserve Bank Square to Ramgiri, Seminary Hills. |
| 44 | South Ambazari Road-Wardha Road Rahate Colony to Ambazari T Point. |
| 45 | East High Court Road-From Income Tax Office to Amravati Road. |
| 46 | West High Court Road from Seminary Hill to M.L.A. Hostel. |

**Executing Agency: Public Works Department**

| Sr. No. (1) | Name of Road (2) |
|---|---|
| | Ring Road |
| | *i)* Widening, strengthening and Bitumen treatment to Bhandara road to Kamptee road. |
| | *ii)* Widening, strengthening and Bitumen treatment to Wardha road to Bhandara road. |
| | *iii)* Widening, strengthening and Bitumen treatment to Chhindwara road to Katol road. |
| | *iv)* Widening, strengthening and Bitumen treatment to Kamptee road to Chhindwara road. |
| | *v)* Widening, strengthening and Bitumen treatment to Amravati road to Hingna road (MIDC Road). |
| | *vi)* Widening, strengthening and Bitumen treatment to Nagpur-Hingna road (part of Ring Road). |
| | *vii)* Construction of Central Divider on Ring Road. |
| | *viii)* Construction of service road between Hingna road to Umrer road. |
| 2 | Hymp Yard Road from Anand Talkies Square to Ajni Rly. Station |

**Executing Agency: Nagpur Improvement Trust**

| Sr. No. (1) | Name of Road (2) |
|---|---|
| 1 | Itwari Station Road from Kamptee road NH-7 to Marwardi Square. |
| 2 | Gayatri Mandir Road (D. P. Road) South Ambazari Road to Ring Road. |
| 3 | Kharbi Road to Ring Road. |
| 4 | Omkar Nagar to Saibaba College |
| 5 | Mangalwari Rly. Crossing gate Harijan Colony to Old Jaripatka (Mekosabagh) to CMPDI to Nara Ghat Road. |
| 6 | Deputy Signal Railway Crossing to Kalamna Market Road. |
| 7 | Umrer Road to Narsala Road. |
| 8 | Takli Feeder Road from Vidyut Bhawan to Kadbi Square to Santra Market Octroi Naka No.13. |
| 9 | Rajbhavan Square to Koradi Road Octroi Naka. |
| 10 | Katol Road from R.B.I. Square to Katol Road Octroi Naka. |
| 11 | North Ambazari Road-Jhanshi Rani Square to Ambazari T Point to Higna Road Octroi Naka. |
| 12 | Ring Road |
| | a) Ring Road-Amravati Road to Katol Road Construction near Wadi. |
| | b) Ring Road-Katol Road to Chhindwara Road Construction of road from Katol side. |
| | c) Construction of road from Chhindwara side. |

**Executing Agency: Maharashtra State Road Development Corporation Limited**

| **Sr.No (1)** | **Name of the Road** (2) |
|---|---|
| 1 | ROB Near Santra Market |
| 2 | ROB Near Irwari Rly. Station |
| 3 | ROB Near H/o Kamalaprasad Dubey |
| 4 | ROB Near Kalamana Market Ring Road |
| 5 | ROB at Mekosabagh on Nagpur Delhi Line |
| 6 | ROB on Ring Road near Mankapur |
| 7 | ROB at Mangalwari Railway Crossing |
| 8 | ROB at Maskasath |
| 9 | RUB on Railway Feeder Road at Mominpura. |
| 10 | Four Lane Bridge on Hatti Nallah near Gangabai Ghat |
| 11 | Four Lane Bridge on Nag River near Juni Shukrawari |
| 12 | Four Lane Bridge A/c Nag River Near Nidos Hotel, Sitabuldi |
| 13 | Flyover on Ring Road at Umrer Road Junction |
| 14 | Flyover on Umred Road at Sakkardara Square. |

By order and in the name of the Governor of Maharashtra,

A. A. SAGANE,
Secretary to Government.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATIONS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004. EDITOR : DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE.